# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### डोंबिवली (ठाणे) येथील मे. विभा कंपनीने सुरु केलेल्या कोविड सेंटरच्या जागी रुग्णालय उभे करण्याबाबत

**(१) ३०६ (१७-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (ठाणे) मधील एमआयडीसी मध्ये मे.विभा कंपनीने कोविड सेंटर सुरु करण्यास महानगरपालिकेची परवानगी घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोंविड सेंटर सुरु करण्यासाठी कोणकोणती वैदयकीय उपकरणे मागविण्यात आली होती, त्याचे स्वरुप काय, सदर वैदयकीय उपकरणांसाठी किती रकमेची तरतूद करण्यात आली होती, मागविण्यात आलेल्या उपकरणापैकी किती उपकरणे वापरण्यात आली याबाबतच्या माहितीचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, डोंबिवली महानगरपालिकेमार्फत मे.विभा इंडस्ट्रीमध्ये सुरु करण्यात आलेल्या कोविड सेंटरचे सुसज्ज रुग्णालय उभारण्यासाठी निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

डोंबिवली (ठाणे) एमआयडीसी येथील मे.विभा कंपनीच्या इमारतीमध्ये कोविड सेंटर महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आले होते व सदर कोविड सेंटर बाह्य संस्थेमार्फत चालविणे प्रस्तावित होते.

(२) सदर कोविड सेंटर सुरु करण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या उपकरणांमध्ये ५८१ जंबो सिलेंडर, २२१ कार्डियाक मॉनिटर्स, २२१ सिरींज पंप्स, २२१ इनफ्युजन पंप्स, ४ पोर्टेबल क्ष किरण यंत्र, ४ सीआर सिस्टीम विथ प्रिंटरर्स्, ४ इसीजी मशिन्स व रुग्णालयीन फर्निचर्समध्ये २२१ आयसीयु खाटा, ३६० रुग्णालयीन खाटा, २० स्ट्रेचर ऑन ट्रॉली, ५८१ बेड्स सीडी लॉकर, २० क्रॅश कार्ट, २० मेडीसीन ट्रॉली, २० व्हीलचेअर, २० ड्युरा सिलेंडर, १ लिक्वीड ऑक्सीजन टँक २१ केएल खरेदी करण्यात आले होते.

शासनाकडून दिनांक २४/०६/२०२० रोजी सदर कोविड सेंटर उभारणेकरीता प्राप्त रुपये ७.०० कोटी एवढा निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला. सदर निधीपैकी वैद्यकीय उपकरणांसाठी एकूण रक्कम रुपये ५,४४,५१,४०३/- खर्च करण्यात आला. व उर्वरित निधी सदर कोविड सेंटरच्या बांधकामावर खर्च करण्यात आला आहे.

कोविड साथरोगाच्या तिसऱ्या लाटेमध्ये रुग्णांना दाखल करण्याचे प्रमाण कमी असल्याने सदर कोविड सेंटर सुरु करण्यात आले नव्हते. सबब, मागविण्यात आलेल्या उपकरणांचा वापर महानगरपालिकेच्या अन्य रुग्णालयांमध्ये करण्यात येत आहे.

(३) विभा मेकेनो या कंपनीची जागा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस तात्पुरते कोविड सेंटर उभारणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील दिनांक २१/०४/२०२१ च्या आदेशान्वये उपलब्ध करुन देण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाकडून कोविडचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर सदर जागा वापराबाबत मुदतवाढ देण्यात आलेली नाही. सदर जागा धनलक्ष्मी बँक यांचे मार्फत खरेदीदारास हस्तांतरित करण्यात आली आहे. त्यामुळे सदर जागी रुग्णालय उभारणे शक्य नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात जलशक्ती अभियान कॅच द रेन अंतर्गत विविध विभागाद्वारे करण्यात आलेल्या कामांबाबत

**(२) ५८४ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात केंद्र पुरस्कृत जलशक्ती अभियान कॅच द रेन अंतर्गत विविध विभागांद्वारे करण्यात आलेल्या कामांचा आढावा केंद्रीय पथकाने घेतला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलशक्ती कॅच दि रेन या अभियानातून जिल्ह्यातील कायम दुष्काळी असणाऱ्या सांगोला, मंगळवेढा, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, करमाळा व पंढरपूर तालुक्यातील काही गावांसह इतर तालुक्यातील सर्व गावांना दररोज पिण्याचे स्वच्छ पाणी आणि शेतीसाठी बारमाही पाणी देऊन जिल्ह्यातील शेती व शेतीपूरक उद्योगांना चालना देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय राठोड (२४-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जलशक्ती अभियान कॅच द रेन योजनेचा मुख्य उद्देश पाण्याची कमतरता असलेल्या प्रदेशांमध्ये जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संचयन व भूजल पुर्नभरणाला लोकसहभागातून प्रोत्साहन देणे हा आहे. या अभियानांतर्गत जलसंधारण आणि पर्जन्य संचयनाची १०४, पाणलोट क्षेत्र विकासाची ७५, पारंपारिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवनाची २५, सांडपाणी व्यवस्थापन व प्रक्रियेची ३ अशी एकूण २०७ कामे करण्यात आली आहेत.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतंर्गत मार्च, २०२४ ते नोव्हेंबर, २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्ह्यात एकूण ६१ जलाशयांमधून ६०.९८ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, ६०९८ स.घ.मी. इतका पाणीसाठा पुनर्स्थापित करण्यात आला आहे.

विविध विभागांच्या अभिसरणाच्या माध्यमातून माहे एप्रिल, २०२४ मध्ये केंद्रीय पथकाने निर्धारित केलेल्या ध्येयाची माहे नोव्हेंबर, २०२४ अखेरपर्यंत ९७ टक्के उद्दीष्टपूर्ती करण्यात आली आहे. भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, सोलापूर यांनी केलेल्या भूजल सर्व्हेक्षणामुळे पाण्याच्या पातळीत सरासरी १.०५ मीटर वाढ झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

**(३) ६२१ (२४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अंशत: अनुदानित शाळांमध्ये प्रचलित नियमानुसार अनुदान सूत्र लागू करणे, संचमान्यता अंतिम करण्याचे शिक्षण उपसंचालकांना अधिकार देणे, N.M.M.S परीक्षामध्ये अंशत: अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना पात्र समजून शिष्यवृत्ती देणे,अंशता अनुदानित शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांना सेवासंरक्षण देणे, मेडिक्लेम योजना लागू करणे, शाळांमध्ये भौतिक सुविधा, संगणक प्रणालीचा वापर वाढविणे. शिक्षक व मुख्याध्यापकांच्या नियमित प्रशिक्षण व कार्यशाळा घेणे, शिक्षकांचे वेतनेतर अनुदान वाढविणे, प्रत्येक शाळेत कला व क्रीडा शिक्षक नेमणे, सीबीएससी पॅटर्न लागू करणे, वेतन वेळेत मिळावे अशा स्वरुपाच्या अनेक प्रलंबित मागण्यांबाबत अंशत: अनुदानित शाळांतील कर्मचारी संघटनांनी वारंवार शासनाकडे निवेदने देऊन तसेच वारंवार मोर्चा व आंदोलनाच्या माध्यमातून मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त पदे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ भरणे, शिपाई ही पदे कंत्राटी पध्दतीने न भरता पूर्णवेळ वेतनश्रेणीत आकृतिबंध नुसार भरणे, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर ही पदे वर्ग ५ ते १० च्या पटसंख्या वर भरणे,वरिष्ठ लिपिक व कनिष्ठ लिपिक ही पदे चिपळूणकर आयोगानुसार भरणे, लिपिक संवर्गातील पदाची सेवा निवृत्तीचे वयोमर्यादा-६० वर्षे करणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगतीचा दुसरा लाभ हा सलग २४ वर्षाच्या सेवेनंतर पुर्वलक्षी प्रभावाने लागू करणे, ०१ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नेमणूक व अंशतः अनुदानित शाळातील कर्मचाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करणे इत्यादी प्रमुख मागण्या असून, सदरच्या मागण्या मंजूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शिक्षण संचालक (माध्यमिक) यांच्या दिनांक २८/०५/२०२५ च्या पत्रान्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवर बंदी लादण्यात आली नसून संचामान्यतेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी स्थगिती देण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतिबंध लागू करण्यात आला होता.त्याचप्रमाणे दिनांक ०७/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतिबंध लागू केल्यामुळे संभाव्य व्यपगत पदे, अतिरिक्त पदे, समावेशन इत्यादीबाबतच्या अटी, शर्ती व कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. या दोन्ही शासन निर्णयांना मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने यानुसार कार्यवाही करता आली नाही. सदर स्थगिती मा.उच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर आकृतिबंध व विहित कार्यपध्दतीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत दिनांक २१/०२/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले होते.

दिनांक ०४/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेत शिक्षकेतर संवर्गातील पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली होती. यास उपरोक्त दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

राज्यातील खाजगी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यता प्राप्त प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक ०१/०१/२०२४ पासून लागू करण्याचा निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे. सदर योजना दिनांक ०१/०१/२०२४ पासून लागू करण्यात आली आहे.

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ३१/१०/२००५ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन (DCPS) योजना लागू करण्यात आली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शा. नि. दिनांक २९/११/२०१० अन्वये याबाबतची कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाविरुध्द विविध न्यायालयीन प्रकरणे मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेली होती. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील पूर्णपीठाने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी या प्रकरणी मार्गदर्शनपर निर्णय दिला.

मा.उच्च न्यायालय, मुंबई मधील दिनांक ३०/०४/२०१९ रोजीच्या आदेशा विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात (सिव्हील) डायरी क्र. (एस) १८४०/२०२२ दाखल विशेष अनुमती याचिका विलंबाच्या कारणास्तव दिनांक ११/०२/२०२२ रोजी खारीज करण्यात आली आहे. तसेच, श्री.प्रदिप महल्ले व इतर यांनी दाखल केलेली विशेष अनुमती याचिका न्यायप्रविष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०/०४/२०१९ च्या आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. सद्य:स्थितीत सदर प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

शिक्षकांचे विविध मागण्यांच्या अनुषंगाने वेळोवेळी नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरामधील वाहतूक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४) ८०९ (१७-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरामध्ये वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी शासनाने एक समिती नेमली असून या समितीच्या आतापर्यंत किती बैठका घेण्यात आलेल्या आहेत, समितीने शासनास आपला

अहवाल सादर केला आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरामध्ये बीआरटी प्रकल्पांमुळे जास्त वाहतूक कोंडी होत असून सद्य:स्थितीत मेट्रो-उड्डाणपुलासह इतर विकासकामे सुरु आहेत, सदर वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, या बीआरटी प्रकल्पाचे शासनाने मूल्यमापन केले आहे काय, तसेच वाहतूक कोंडीच्या दृष्टिकोनातून बीआरटी प्रकल्प बंद केल्यास येथील वाहतूक कोंडी कमी करणे शक्य आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) पुणे व परिसरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेस चालना देणे, वाहतूक विषयक विविध समस्या सोडविण्याकरीता दिनांक ०४ जून, २०१९ च्या शासन निर्णयान्वये पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणाची (PUMTA) ची स्थापना करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सदर समितीच्या आज अखेर १७ बैठका पार पडल्या असून सदर बैठकांचे अहवाल संबंधित विभागास पाठविण्यात आले आहेत.
(२) केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. कार्यक्रम अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख रस्ते बीआरटीएस कॉरीडॉर म्हणुन घोषित केले. सदर रस्त्यावर पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. मार्फत सार्वजनिक बस वाहतूक संचालन करणेत येते आहे. सदर सार्वजनिक वाहतुकीमुळे शहरातील नागरीकांना एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी ये-जा करणेकरीता जलद प्रवासाचा सक्षम पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड शहरातील ज्या रस्त्यावर महामेट्रोचे काम चालु आहे ते काम पूर्ण होईपर्यंत सदर रस्ता देखभाल दुरुस्ती करणेकरीता महामेट्रोकडे हस्तांतरण करणेत आलेला आहे. सदर रस्त्यावरील महामेट्रोच्या कामाकरीता आवश्यक ठिकाणी वाहतूक वळविणेबाबत पिंपरी चिंचवड पोलीस वाहतूक शाखेकडून महामेट्रोने आवश्यक परवानगी घेवून वाहतूक कोंडी कमी करणेच्या अनुषंगाने उपाययोजना केलेल्या आहेत.
(३) सदर बीआरटी वाहतूक बंद केल्यास बीआरटीएस बसचा वापर करणाऱ्या नागरिकांना खाजगी वाहनांचा वापर करावा लागेल. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी, ध्वनी व वायु प्रदुषणात वाढ होईल तसेच इंधनाच्या वापरात वाढ होऊन पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास होणेची शक्यता आहे. तसेच शहरातील बीआरटी मार्गिका ही महामेट्रो स्थानका पर्यंत पोहचण्याची पुरक व्यवस्था आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित असलेले बीआरटी मार्गिका व बीआरटी स्थानके सुस्थितीत राहण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमधील शिक्षक ठोक मानधन तत्वावर कार्यरत असल्याबाबत

**(५) १४२४ (१७-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये ठोक मानधन तत्वावर ३१ शिक्षकांची भरती दिनांक १७ सप्टेंबर, २०१८ रोजी केली असून सन २०१७,२०१८,२०१९ मध्ये देखील प्राथमिक विभागाकडे २९ शिक्षक व माध्यमिक विभागाचे २१ शिक्षक असे ५० शिक्षकांची ठोक मानधन तत्वावर भरती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकांना नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांमध्ये दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कायम करण्याची तरतूद असतानाही त्यांना कायम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१८ मध्ये भरती केलेले ३१ शिक्षकांना अद्यापही कायम न करण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर ३१ शिक्षकांपैकी कै.अमित वनगा या शिक्षकाचे निधन झाले असून उर्वरित शिक्षक आजही ठोक मानधन तत्वावर कार्यरत आहेत अशा शिक्षकांना नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये कायम सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर करार पध्दतीने (कंत्राट) तात्पुरत्या स्वरुपात वेतन श्रेणी, किमान वेतन व ठोक मानधनावर कार्यरत प्राथमिक सहा. शिक्षक २९ व माध्यमिक सहा. शिक्षक २१ अशा एकूण ५० शिक्षकांच्या नियुक्त्या ह्या विहीत प्रक्रियेने (जाहिरात / लेखी परिक्षा/ मुलाखत) करण्यात आलेली आहे.
(२) नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाचा आकृतिबंध दिनांक १५/१२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) या संवर्गाची १३१ पदे व प्राथमिक शिक्षकांची ३७२ पदे नव्याने मंजूर करण्यात आलेली आहेत.

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः नमुंम- १२२२/ सं.क्र.६३ / प्र.क्र.१३ / नवि-२८, दिनांक ०८ नोव्हेंबर २०२३ नुसार नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या आस्थापनेवरील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कार्यरत ठोक मानधनावरील एकूण ५० शिक्षकांच्या नेमणूका विहीत मार्गाचा अवलंब करुन झाल्याने, सदर शिक्षकांना आकृतीबंधातील मंजूर व रिक्त पदांवर कायम करण्यात आले.
(३) दिनांक ३१ मे, २०११ रोजीच्या दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात मुलाखत वॉक-इन सिलेक्शनद्वारे (Walk in Selection) शिक्षण सेवकाच्या मुलाखतीच्या यादीमध्ये नावे असलेली मात्र जागा रिक्त नसल्यामुळे निवड न झालेले तसेच गुणांची टक्केवारी कमी असल्याची कारणे नमूद करून अपात्र घोषीत केलेले २३ उमेदवार हे शिक्षक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता पूर्ण करीत असल्यामुळे त्यांना सन २०११-१२ व सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर सहाय्यक शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. तसेच, ७ शिक्षकांचा सहभाग या भरतीप्रक्रियेमध्ये नाही. त्यांना थेट तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्ती दिलेली आहे. या ३० (२३+७) तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावरील शिक्षकांच्या सेवा शाळेमध्ये शिक्षकांची आवश्यकता लक्षात घेता सहा-सहा महिन्यासाठी सेवेमध्ये खंड देऊन आजमितीस सुरू आहे.
(४) ३१ शिक्षण सेवकापैकी जाहिरातीमधून नियुक्त झालेले २५ शिक्षण सेवकांनी त्यांना कायमस्वरूपी सहाय्यक शिक्षक पदावर नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालय रिट याचिका क्र. ८२७५/२०१६ दाखल केली असून, सद्य:स्थितीत सदर याचिका मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

## नवी मुंबई महानगरपालिकेतील ३१ माध्यमिक शिक्षक सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(६) १५१६ (१७-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्रमांक १५४१ दिनांक १९ ऑक्टोबर, २०१२ नुसार नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये ३१ माध्यमिक शिक्षण सेवकांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १४ जून, २०१४ रोजी या शिक्षकांचा शिक्षण सेवक कालावधी संपुष्टात आला आहे काय, तसेच ३१ शिक्षण सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१९ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेने मा.अवर सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे सदरहू शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी लागू करावा याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये ३१ माध्यमिक शिक्षण सेवकाना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०४-२०२६) :** (१) तत्कालीन शिक्षण मंडळ नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक २३ जुलै, २०१० रोजी तात्पुरत्या स्वरूपातं वॉक इन सिलेक्शन पध्दतीने ठोक मानधन तत्वावर २५ शिक्षकांना दिनांक ०४/०८/२०१० पासून दिनांक १५/१२/२०१२ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर नियुक्ती दिलेली होती. त्यानंतर ०६ शिक्षकांना तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर थेट नियुक्ती देण्यात आली होती.

या ठोक मानधन ३१ (२५+६) शिक्षकांना सेवेमध्ये खंड देऊन त्यांना सहा-सहा महिन्यासाठी पुनश्चः नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते.

(२) महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये दिनांक १९ ऑक्टोंबर २०१२ रोजी मंजूर ठराव क्र. १५४१ अन्वये या ३१ (२५+६) ठोक मानधन शिक्षकांच्या संवर्गात पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १५ जून, २०११ पासून पुढील ०३ वर्षाकरीता ‘शिक्षण सेवक’ असा बदल शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहून करण्यात आला.

(३) हे खरे नाही.

(४) ३१ शिक्षण सेवकापैकी जाहिरातीमधून नियुक्त झालेले २५ शिक्षण सेवकांनी त्यांना कायमस्वरूपी सहाय्यक शिक्षक पदावर नियमित वेतनश्रेणीवर नियुक्ती मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालय रिट याचिका क्र. ८२७५ / २०१६ दाखल केली असून, सध्यस्थितीत सदर याचिका मा.न्यायालयात प्रलंबित आहे.

प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने या शिक्षण सेवकांचा कालावधी नियमित करणे व त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर ३० मधील नवी मुंबई महानगरपालिकेची शाळा सुरू करण्याबाबत

**(७) २७८२ (१७-०७-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर ३० मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने सुमारे ७ कोटी ७५ लाख खर्च करून सुसज्ज अशी शाळेची इमारत बांधली असून इमारत विद्यार्थ्यांविना बंद असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, तांत्रिक बाबी पूर्ण करून सदरील शाळा सुरू करण्यास किमान सहा महिन्याचा कालावधी लागणार असल्याचे उपायुक्त, शिक्षण विभाग यांच्याकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या इमारतीत सर्व व्यवस्था असतानाही शाळा सुरू न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर शाळा लवकरात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नेरुळ (नवी मुंबई) येथील सेक्टर ३० या शाळा इमारतीमध्ये नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ५ धारावे व नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ६ करावे या शाळांचे इमारतीचे डागडुजीचे / दुरूस्तीचे काम सुरू असल्याने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ५ दारावे या शाळेतील बालवाडी ते इयत्ता ५वी चे वर्ग व नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ६ करावे या शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वी चे वर्ग या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत या इमारतीमध्ये नर्सरी ते ८ वी च्या वर्गातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे सदर इमारत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरली जात आहे. त्यामुळे इमारत विद्यार्थ्यांविना बंद नाही.

(२) होय, खरे आहे,

सदर इमारतीमध्ये सी.बी.एस.ई. बोर्डाची शाळा सुरू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांची मागणी होती. त्यामुळे सी.बी.एस.ई. शाळा सुरू करणेसाठी आवश्यक असलेल्या भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्यानंतर या इमारतीमध्ये सी.बी.एस.ई. बोर्डाची शाळा सुरू करणेबाबत पुढील उचित निर्णय घेण्यात येईल, असे सांगण्यात आले होते.

(३),(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या कनिष्ठ लेखा परिक्षक/रोखपाल गट-क संवर्गात कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिल्याबाबत

**(८) २७९३ (१७-०७-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये संवर्गनिहाय पदस्थापना, बदल्या न करता अर्थपूर्ण व्यवहार करुन पदस्थापना, बदल्या केल्या जात असल्याच्या तक्रारी विभागाकडे प्राप्त झाल्या असून सद्य:स्थितीत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सचिव पदाच्या निम्नसंवर्गातील कार्यरत कर्मचारी हे महानगरपालिका सचिव पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र.कडोंम-१०२०/प्र.क्र.३/नवि-२८ दिनांक १जुन,२०२१ रोजी शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार ७(३) तांत्रिक कर्मचाऱ्यांना प्रशासकीय पदावर नियुक्ती करता येणार नाही असा शासन निर्णय असतानाही मूळ नेमणूक तांत्रिक संवर्गातील असलेल्या मुख्य उदयान अधीक्षक पदावरील संबंधित अधिकाऱ्यास प्रथम महानगरपालिका सचिव आणि आता “ उपायुक्त “ या प्रशासकीय पदावर अतिरिक्त कार्यभार /पदस्थापना / बदली नियमबाहय देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नियमबाहय पदस्थापना,बदली बाबत सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणूनही अदयापही संबंधित अधिकाऱ्याची मूळ नियुक्ती असलेल्या “ मुख्य उदयान अधीक्षक “ या पदावर पदस्थापना, बदली न करता पुन्हा “उपायुक्त “ पदी बेकायदेशीर नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त शासन निर्णयाचे अवलोकन न करता, व अर्थपूर्ण व्यवहाराने झालेल्या बदल्या,पदस्थापना तात्काळ रदद करुन त्यांना त्यांच्या मूळ नियुक्ती असलेल्या ठिकाणी कार्यभार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासकीय सोय व कामकाजाची निकड विचारात घेऊन, प्रशासकीय श्रेणी-१ संवर्गात महानगरपालिका सचिव पदासाठीची विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणारा अधिकारी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.
महानगरपालिका सचिव पदाच्या निम्न संवर्गातील कार्यरत कर्मचारी श्री.किशोर शेळके, उप सचिव पदावर कार्यरत होते ते सचिव पदाची अर्हता धारण करीत असल्याने दिनांक २३/१२/२०२४ पासून सचिव पदावर नियमित पदोन्नतीने कार्यरत आहेत.
(२) हे अंशतः खरे आहे.

नगरविकास विभागाच्या दिनांक ४ मे, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार उद्यान विभागाचा समावेश प्रशासकीय सेवेत होत आहे. तथापि, मुख्य उद्यान अधीक्षक पदाची अर्हता व सेवा प्रवेश नियम, २०१० आणि २०२१ नुसार सदर पद हे तांत्रिक सेवेमध्ये येत आहे.
प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी मुख्य उद्यान अधीक्षक पदावर कार्यरत अधिकारी यांना उपायुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात आलेला आहे. त्यापदावर कोणतीही कायमस्वरुपी नियुक्ती

देण्यात आलेली नाही.

(३) प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी ‘मुख्य उद्यान अधीक्षक’ यांना त्यांचे मूळ कामकाज सांभाळून उप आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तथापि, त्यांना उप आयुक्त या पदावर कायमस्वरूपी नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(४) ‘मुख्य उद्यान अधीक्षक’ या मूळ पदाचे कामकाज सांभाळून प्रशासकीय कामाच्या सोईसाठी उप आयुक्त या पदाचा सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. सबब, सदर प्रकरणी कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) सेवा भरती नियम, २०२१ नुसार महानगरपालिका सचिव पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद नाही. सदर पदावर निम्न संवर्गातील उप सचिव पदावरुन महानगरपालिका सचिव पदावर पदोन्नतीने नियुक्ती करण्याची तरतूद आहे. निम्न संवर्गातील श्री.किशोर शेळके सचिव पदासाठी पात्र उमेदवार असल्याने, दिनांक १९/१२/२०२४ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये श्री.किशोर शेळके यांना सचिव पदासाठी पात्र करण्यात आले असून, सद्य:स्थितीत महानगरपालिका सचिव पदावर नियमित पदोन्नतीने कार्यरत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेच्या सहलीत एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याबाबत

**(९) ३१७३ (१८-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांच्या इमॅजिका पार्क येथील सहलीदरम्यान आयुष सिंग या १४ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सन २०१६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता ऐन उन्हाळयाच्या दिवसात शाळकरी मुलांना ॲडव्हेंचर पार्कमध्ये नेण्याच्या निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी किडझानिया तर इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांकरीता इमॅजिका पार्क यांच्या समवेत सहलीचा करार करताना ई-निविदा प्रक्रिया राबविण्याऐवजी एकल स्त्रोत पध्दतीने ही कंत्राटे काढून निर्णय घेण्याची कारणे काय आहेत व सदरहू प्रक्रिया कोणामार्फत राबविण्यात आली,

(४) असल्यास, या प्रकरणी एकल स्त्रोत पध्दतीचा वापर केल्याने झालेल्या नुकसानाचा तपशिल काय आहे, व या नुकसानीस जबाबदार संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

प्राथमिक शवचिकित्सा अहवालानुसार विद्यार्थ्यांचा मृत्यू cause of death cardio respiratory arrest due to acute myocardial infarction नैसर्गिक मृत्यू असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी

प्रमाणित केले आहे.

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे दिनांक २०/०७/२०१७ रोजीच्या "पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत शैक्षणिक सहल आयोजित करण्याबाबतच्या" शासन निर्णयातील तरतुदीनुसार शालेय विद्यार्थ्यांना भौगोलिक, सांस्कृतीक व शैक्षणिक बाबत ज्ञान व्हावे व त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्यास मिळाव्यात म्हणून सदर सहलीचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या सूचनांनुसार वॉटर पार्क व मोठ्या राइडस् करण्यात आलेल्या नाहीत व त्याचा सहलीमध्ये समावेश नाही.

(३) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये ६ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांची इमॅजिका थिम पार्क येथे सहल आयोजित करणेबाबत ई-टेंडरींग पध्दतीद्वारे

दिनांक ०५/१२/२०२३ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. मात्र सदर निविदेमध्ये एकाही निविदाधारकांनी सहभाग न घेतल्याने फेर निविदा दिनांक ३०/०१/२०२४ रोजी सादर करण्यात आली होती. सदर फेर निविदेमध्ये एकाही निविदाधारकांनी सहभाग न घेतल्याने फेर निविदा दिनांक ०७/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदाधारक पात्र न झाल्यामुळे सदर निविदेवर पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

सन २०२४-२५ किडझानिया व इमॅजिका कंपनीने सहलीसाठी प्रस्ताव सादर केला होता.त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत इयत्ता ६ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना इमॅजिका थिम पार्क खोपोली येथे दिनांक १७/०२/२०२५ पासून शालेय सहलीचे नियोजन करण्यात आले होते. शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४ दिनांक ०१/१२/२०१६ मधील ३/०२/६ नुसार एकल स्त्रोत नुसार मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(४) शासन निर्णय क्र. भांखस- २०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४ दिनांक ०१/१२/२०१६ मधील ३/०२/६ नुसार एकल स्त्रोत नुसार मंजुरी घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(१०) ३२१३ (१८-०७-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक : तारांकित प्रश्न क्रमांक १७१२७ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दरवर्षी अनुषंगिक खर्चासाठी वेतनाच्या ४ % व १ % इमारत भाडे म्हणून वेतनेतर अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८ नंतर १००% अनुदानावर आलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर वेतन अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्यांच्या पाच टक्के प्रमाणे वेतनेत्तर अनुदान ४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे/ देखभाल अनुदान) दिनांक १ एप्रिल, २०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली असून याबाबतचा आयुक्त (शिक्षण) यांचेकडून मागविण्यात आलेल्या सुधारीत प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच १०० % अनुदानित शाळांना समान न्याय

तत्वाप्रमाणे वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-०४-२०२६) :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१३ व दिनांक २९/०१/२०१४ अन्वये, दिनांक ०१/०४/२००८ रोजी १०० टक्के योजनेतर (Non Plan) योजनेमध्ये वेतन घेणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानावर असलेल्या शिक्षण विभागांतर्गत राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन २००८ या वर्षी पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या टप्प्यावर अनुदान अनुज्ञेय होते, त्या टप्प्यावरील देय वेतन अनुदानास गोठवून त्याच्या पाच टक्के वेतनेत्तर अनुदान (४ टक्के वेतनेत्तर अनुदान व १ टक्का इमारत भाडे / देखभाल अनुदान) रुपये २६६.८२ कोटीच्या मर्यादेत दिनांक ०१/०४/२०१३ पासून उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ करीता राज्यातील खाजगी अनुदानित संस्थांच्या खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना देण्यात येणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाकरीता एकूण रुपये २६८.९९ कोटी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी चौकापासून ते कमला क्रॉस इमारतीपर्यंत (जि.पुणे) महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय नसल्याबाबत

**(११) ३८५९ (१७-०७-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पुणे मुंबई महामार्गावर पिंपरी चौक ते स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा, कोहिनूर सोसायटी या रहदारीच्या ठिकाणी पिंपरी चौकापासून ते कमला क्रॉस इमारतीपर्यंत महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याने ही गैरसोय दूर करून आधुनिक स्वच्छतागृहाची तातडीने उभारणी करण्याची मागणी रहिवाशी तसेच नागरिकांनी केल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार आधुनिक स्वच्छतागृहाची तातडीने उभारणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययेजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई-पुणे महामार्गालगत Urban Street Scape Development अंतर्गत संपूर्ण महामार्गावरील १० ठिकाणी सार्वजनिक शौचालये उभारण्याचे नियोजन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर आता वडाळा येथे मिनी बीकेसी उभारण्याचे नियोजन केल्याबाबत

**(१२) ४७५५ (१४-१२-२०२५) श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलाच्या (बीकेसी) धर्तीवर आता वडाळा येथे मिनी बीकेसी उभारण्याचे मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरणाने (एमएमएआरडीने) नियोजन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संकुलासाठी किती हेक्टर क्षेत्रफळ राहणार आहे, सदर ठिकाणी येणाऱ्या व्यावसायिकांना कोणत्या अटीवर भूखंड देण्यात येणार आहे. सदर संकुल किती कालावधीत उभारण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुंबईत वांद्रे-कुर्ला संकुलाच्या (बीकेसी) धर्तीवर आता वडाळा येथे मिनी बीकेसी उभारण्याचे मुंबई महानगर प्रदेशविकास प्राधिकरणाने केलेले नियोजन पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०३/१२/२००५ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे वडाळा ट्रक टर्मिनलसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमणूक केली आहे. तद्नंतर नगरविकास विभागाच्या दिनांक १६/०९/२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे वडाळा अधिसूचित क्षेत्राच्या विकासाचा उद्देश हा ट्रक टर्मिनल (ISBT) ऐवजी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर वाणिज्यिक असा मंजूर केला आहे व वडाळा अधिसूचित क्षेत्राकरीता सुधारीत नियोजन प्रस्तावास व विकास नियंत्रण नियमावलीस मंजूरी देण्यात आली आहे. सदर नियोजन प्रस्तावाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. वडाळा अधिसूचित क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ १२२.१० हे. एवढे आहे.

सदर अधिसूचित क्षेत्रातील भूखंडाचे वाटप हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या 'जमिनीची विल्हेवाट नियमावली-१९७७' नुसार करण्यात येणार आहे. सदरहू संकुल सन २०५३ पर्यंत पूर्णपणे विकसित करण्याचे नियोजित आहे.

---

## धारावी पुनर्विकासाअंतर्गत अपात्र रहिवाशांना घरे देण्यासाठी मिठागरांच्या जमिनींचा वापर केला जाणार असल्याबाबत

**(१३) ४९७७ (१४-१२-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी पुनर्विकासाअंतर्गत अपात्र रहिवाशांना धारावीबाहेर घरे देण्यासाठी कांजूरमार्ग, भांडूप येथील मिठागरांच्या जमिनींचा वापर केला जाणार आहे मात्र तेथील जमिनींविरोधात न्यायालयात खटले दाखल असल्याने या जागा मिळण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या जमिनी मिळविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०४-२०२६) :** (१) व (२) धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत अपात्र झोपडीधारकांना परवडणारी भाडे तत्वावरील (Rental/Affordable Housing) घरांच्या बांधकामासाठी मुंबई उपनगर जिल्हयांतील केंद्र शासनाच्या मालकीची २५५.९ एकर मिठागराची जमीन राज्य शासनाला हस्तांतरीत करण्याबाबत केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर जमीनीपैकी मौजे-मुलूंड येथील ४२.५ एकर जमीनीचा ताबा धारावी पुनर्विकास प्रकल्पास दिनांक १४/०४/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे.

तसेच केंद्र शासनाच्या मालकीच्या मौजे-कांजूर न.भू.क्र. ६५७ अ व भांडूप येथील न.भू. क्र. ७३० येथील मिठागराच्या जमिनींबाबत प्रलंबित/चालू न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दिनांक ०३/०९/२०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवाजी चौक ते गांधी चौक (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील फेरीवाल्यांचे अतिक्रमण हटवून व्यापारी संकुलाचे बांधकाम करून फेरीवाल्यांना वाटप करण्याबाबत

**(१४) ५३४९ (१४-१२-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी चौक ते गांधी चौक,आर्वी (ता.आर्वी, जि.वर्धा)येथील फेरीवाल्यांचे अतिक्रमण हटवून त्यांना उपविभागीय कार्यालय व तहसिल कार्यालयाच्या जुन्या रिक्त असलेल्या जागेवर व्यापारी संकुल बांधकाम करून फेरीवाल्यांना वाटप करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी माननीय मुख्यमंत्री यांना दिनांक १४/१०/२०२५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आर्वी शहरातील सदर रस्ता हा मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर ये-जा करणाऱ्या वाहनाची व लोकांची वर्दळ असल्याने याच ठिकाणी भाजी विक्रेते, फळ विक्रेते अतिक्रमण करून आपला व्यवसाय करीत असल्यामुळे वाहतुकीस समस्या उद्भवून अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समस्यांचे कायमस्वरुपी निराकरण करण्याच्या दृष्टीनेअतिक्रमण धारकांना जुन्या उपविभागीय व तहसिल कार्यालयाच्या जागेवर व्यापारी संकुल बांधण्यास मंजूरी मिळून त्याचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

आर्वी शहरातील शिवाजी चौक ते गांधी चौक हा शहरातील मुख्य बाजारपेठेचा रस्ता असून काही वेळेस सदर रस्त्यावर हातगाड्यांमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत होतो. तथापि, नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी सदर हातगाड्यांचे अतिक्रमण हटविण्यात येते.

(३) नगरपरिषद आर्वी कार्यालयाद्वारे जुन्या उपविभागीय अधिकारी कार्यालय व जुन्या तहसिल कार्यालयाची जागा नगरपरिषदेस व्यापारी संकुल बांधकाम करण्यासाठी मिळण्याबाबत जागा मागणी प्रस्ताव दिनांक ०७/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, आर्वी यांना सादर केला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, वर्धा यांनी जुन्या तहसिल कार्यालयाची जागा अधिमुल्याची रक्कम प्रदान करण्याबाबत दिनांक ०२/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेस कळविले आहे. याबाबत पुढील कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चौक (ता.खालापूर, जि.रायगड) येथील उजाला हॉटेलमध्ये वडापाव मध्ये मृत पाल आढळून आल्याबाबत

**(१५) ५३८५ (१४-१२-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौक गावातील (ता.खालापूर, जि.रायगड) येथील उजाला हॉटेलमध्ये अनेक ग्राहक दररोज या भोजनासाठी येत असून सदर हॉटेल मधील वडापाव मध्ये मृत पाल आढळून आल्याची बाब निदर्शनास आली असूनही सदर हॉटेल सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अन्न पदार्थात अशा प्रकारे कीटक आढळल्याने अन्नसुरक्षेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले असून स्थानिक पातळीवर अनेक नागरिकांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत अन्न व औषध प्रशासनाने तात्काळ चौकशी करून संबंधित हॉटेलवर कडक कारवाई करावी, अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उजाला स्वीट्समध्ये आलेल्या ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण असून स्वच्छतेकडे दुर्लक्ष करून व्यवसाय करणाऱ्या सदर हॉटेल व्यावसायिकावर व सबंधित दोषींवर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून कडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.नरहरी झिरवाळ (०२-०४-२०२६) :** (१), (२) व (३) मे. उजाला हॉटेल, चौक, ता.खालापूर, जि.रायगड मधील वडापाव मध्ये मृत पाल आढळून आल्याची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आली नाही.

तथापि, ग्राहकाला वडापावमध्ये पालसदृश किटक आढळून आल्याचे सोशल मिडीयावर प्रसारित झाल्याचे दिनांक ३०/०९/२०२५ रोजी निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने प्रशासनामार्फत त्याच दिवशी चौकशी केली असता सदर बाब मे.उजाला स्वीट्स च्या बाजूला असलेल्या मे.जय भवानी हॉटेल, घर नं. ४६६ (जुना नंबर १/१५बी), मु.पो. चौक, ता.खालापूर, जि.रायगड या आस्थापनेत घडल्याचे निदर्शनास आले.

सदर प्रकरणी मे. जय भवानी हॉटेल या अन्न आस्थापनेची तपासणी करून बटाटे वडा (तयार अन्नपदार्थ) व रिफाईन्ड पामोलीन तेल या अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणास्तव अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा,मुंबई येथे पाठविण्यात आले होते. सदर अन्नपदार्थांच्या नमुन्यांचे अहवाल प्रमाणित घोषित झाले आहेत. तथापि, तपासणी अहवालातील इतर त्रुटींच्या अनुषंगाने सदर आस्थापनेची नोंदणी तात्काळ निलंबित करण्यात येऊन अन्न सुरक्षा व मानके कायदयातील तरतुदींच्या उल्लघंन प्रकरणी सदर पेढीविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ कलम ६९ अन्वये २०,०००/- दंड ठोठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्राहक संरक्षण न्यायालयांत ७० हजारांहून अधिक तक्रारी प्रलंबित असल्याबाबत

**(१६) ६६५४ (२४-०३-२०२६) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्राहक संरक्षण न्यायालयांत ७० हजारांहून अधिक तक्रारी प्रलंबित असल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली असून ग्राहकाना न्याय मिळवून देणारे ग्राहक संरक्षण आयोगात अनेक पदे रिक्त असल्यामुळे ग्राहकांच्या तक्रारी प्रलंबित आहेत, राज्यात ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी व ग्राहकाच्या हितासाठी राज्य ग्राहक आयोग स्थापन करण्यात आले असून या आयोगाकडे तक्रार दाखल केल्यास तक्रारी तातडीने निकालात काढण्याकरीता मनुष्यबळ अभाव असून प्रलंबित भरती प्रक्रिया राबविली गेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्हा ग्राहक निवारण आयोगासमोर ४५०० पेक्षा अधिक तक्रारी व वसुली प्रकरणे प्रलंबित असून केवळ १५०० चौ.फुटांच्या मर्यादित जागेत आयोग काम करित असून आवश्यक सुविधा नसल्याने त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयोग वर्षानुवर्षे जागेच्या शोधात असून जिल्ह्यात नव्याने उभारलेल्या इमारतींमध्ये आयोगास जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी करुनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ग्राहक संरक्षण न्यायालयातील दावे शीघ्र गतीने निकालात निघण्यासाठी आयोगातील लघुलेखक, निम्न श्रेणी लिपिक, टंकलेखक अशी महत्वाची पदे रिक्त असून नियमित कामकाजात व्यत्यय येत असून ग्राहक तक्रार निवारण आयोगासाठी कायमस्वरुपी जागा देण्याबाबत व आयोगातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२३-०४-२०२६) :** (१) सद्य:स्थितीत राज्यातील ग्राहक तक्रार निवारण आयोगात ७० हजारांहून अधिक तक्रारी प्रलंबित असल्याचे दिसून येत आहेत. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील ०३ सदस्य तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील १२ अध्यक्ष पदे व २४ सदस्य पदे रिक्त असून

या पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत अध्यक्ष व सदस्य यांना देण्यात आला आहे. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगातील सदस्य व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगातील अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती Consumer Protection (Qualification for appointment, method of recruitment, procedure of appointment, term of office, resignation and removal of President or Member of State Commission or District Commission) Rules, २०२० अन्वये करण्यात येते. सदर नियम सुधारित करण्याच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने शासन स्तरावर अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्ती प्रक्रिया प्रलंबित आहे.

(२) सद्य:स्थितीत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे येथे एकूण ४९४७ प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हातील सर्व आयोगांसाठी तांत्रिक सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी संगणक व इतर साधनसामुग्री खरेदीसाठी शासन निर्णय दिनांक १२/०२/२०२६ अन्वये रुपये ४,९१,२९,३००/- एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने खरेदीबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

(३) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे सन १९९१ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, २ रा मजला, रुम क्र. २१४ मध्ये सुमारे २१५२ चौ.फु. मीटर जागेत कार्यरत आहे. सदर आयोगासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल असून सद्यस्थित प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) सद्य:स्थितीत लघुलेखक (निम्नश्रेणी) व लिपिक-टंकलेखक या पदांच्या भरतीबाबतची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुरू आहे.

---

## घाटी (जि.छत्रपती संभाजीनगर) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास स्वायत्तेचा दर्जा देण्याबाबत

**(१७) ६६६३ (१७-०३-२०२६) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील बी.जे. मेडीकल कॉलेज (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिनांक ८ ऑगस्ट, २०२५रोजी वा त्यादरम्यान पत्र देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत घेण्यात येणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) हे ७० वर्षापुर्वी स्थापन झाले असून सदर रुग्णालयात मराठवाडा, विदर्भ, खान्देश व पश्चिम महाराष्ट्रातील रुग्ण उपचारासाठी येत असून प्रतिदिन सरासरी ४००० रुग्णाची ओपीडी येथे होत असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) छत्रपती संभाजीनगर या संस्थेस स्वायत्त दर्जा दिल्यास संस्थेस अधिकचा निधी मिळून रुग्णांना अधिकाधिक व दर्जेदार वैद्यकीय सोई - सुविधा उपलब्ध करून देता येईल , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुण्यातील बी.जे. मेडीकल कॉलेज (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन महाविद्यालयांना

स्वायत्ततेचा दर्जा देण्याच्या धर्तीवर घाटी रुग्णालयास स्वायत्त दर्जा देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२४-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पहिल्या टप्प्यात ग्रँन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालय, मुंबई, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व बी. जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने माजी मुख्य सचिव श्री.जयंत कुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये व दिनांक २४/०३/२०२६ रोजीच्या पूरकपत्रान्वये समिती गठित करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) संलग्नित रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात २५००-३००० रुग्ण उपचार घेत असून शस्त्रक्रियागार गृहे, एमआरआय, सीटीस्कॅन, डिजीटल एक्स रे इ. सुविधा उपलब्ध आहेत. केंद्र शासनामार्फत मंजूर करण्यात आलेला ५० खाटांच्या क्रिटीकल केअर युनिटची उभारणी करण्यात येत आहे. सदर संस्थेशी संलग्नित राज्य कर्करोग रुग्णालयात मॅमोग्राफी, रोबोटिक सर्जरी अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. प्रधानमंत्री स्वास्थ सुरक्षा योजनेंतर्गत कार्यान्वित करण्यात आलेले अतिविशेषोपचार रुग्णालयात ८ विषयांमध्ये सुपरस्पेशालिटी मंजूर असून सर्व विभाग पूर्ण क्षमतेने कार्यरत असून रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सोयी - सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा ग्राहक निवारण आयोगास कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) ७१९३ (२४-०३-२०२६) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हा ग्राहक निवारण आयोगासमोर ४५०० पेक्षा अधिक तक्रारी व वसुली प्रकरणे प्रलंबित असून केवळ १५०० चौ.फुटांच्या मर्यादित जागेत आयोग काम करित असून ठाणे जिल्ह्यात नव्याने उभारलेल्या इमारतींमध्ये आयोगास जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी आयोगाने करुनही प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात समोर आली आहे, हे खरे आहे काय?
(२) असल्यास, आयोगातील लघुलेखक, निम्न श्रेणी लिपिक, टंकलेखक अशी महत्वाची पदे रिक्ते असून आवश्यक सुविधा नसल्यामुळे नियमित कामकाज करण्यासाठी अनेक समस्या उद्भवत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ठाणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगासाठी कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत व आयोगातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२३-०४-२०२६) :** (१) सद्य:स्थितीत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे येथे एकूण ४९४७ प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे सन १९९१ पासून जिल्हाधिकारी कार्यालय, २ रा मजला, रुम क्र. २१४ मध्ये सुमारे २१५२ चौ.फु. मीटर जागेत कार्यरत आहे. सदर आयोगासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल असून सद्यस्थित प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे येथे गट-ब ते गट-ड संवर्गातील १२ पदे मंजूर असून त्यापैकी सद्य:स्थितीत लघुलेखक (निम्नश्रेणी) व लिपिक-टंकलेखक ही २ पदे रिक्त आहेत. जिल्हातील सर्व आयोगांसाठी तांत्रिक सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी संगणक व इतर साधनसामुग्री खरेदीसाठी शासन निर्णय दिनांक १२/०२/२०२६ अन्वये रुपये ४,९१,२९,३००/- एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुषंगाने खरेदीबाबतची प्रक्रिया सुरु आहे.
अध्यक्ष व सदस्य, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांनी माहे मार्च, २०२५ ते माहे जुन, २०२५ पर्यंत आभासी सुनावणीद्वारे तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहून पार पाडले आहे.
(३) ठाणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगासाठी जागा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल असून सद्यस्थित प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. आयोगातील सद्य:स्थितीत लघुलेखक (निम्नश्रेणी) व लिपिक-टंकलेखक या रिक्त पदांच्या भरतीबाबतची प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंध कास्कोपोकीटीन हायस्कूल मरोळ चेंबूर (मुंबई) येथील मुख्याध्यापक यांचेवर विविध गंभीर गुन्हे दाखल असल्याबाबत

**(१९) ७४५८ (१७-०३-२०२६) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंध कास्कोपोकीटीन हायस्कूल मरोळ, चेंबूर, मुंबई येथील मुख्याध्यापक यांचेवर विविध गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले असून यापूर्वीही जयहिंद ॲकॅडमी हायस्कूल जुनियर कॉलेज, उल्हासनगर येथे ते मुख्याध्यापक पदावर कार्यरत असताना सन २००२ मध्ये त्यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत कार्यवाही करून त्यांना बडतर्फ करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या त्यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून किंवा संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात आली आहे काय, ती कोणत्या स्तरावर सुरु आहे आणि आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) संबंधित मुख्याध्यापक यांचेवर गुन्हा दाखल झाल्यानंतर संस्थेने मुख्याध्यापक यांना बडतर्फ केलेले आहे. तसेच मा.महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय, कुर्ला येथे पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेरळ-कळंब (ता.कर्जत, जि.रायगड) या राज्य मार्गांवरील धामोते ते कोदीवले या भागातील रस्त्याचे क्रॉक्रीटीकरण करण्याबाबत

**(२०) ७७३८ (२४-०३-२०२६) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ-कळंब पोही फाटा (ता.कर्जत, जि रायगड) या राज्य मार्गांवरील धामोते ते कोदीवले या भागातील रस्ता धुळीचा बनला असून सदर रस्त्याला कॉक्रीटीकरणाची मंजुरी मिळाली असूनही काम सुरु झाले नसल्याने स्थानिकांसह विद्यार्थ्यांना प्रवास करताना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळीमुळे सदर रस्त्याची दुरवस्था झाली असून वाहनचालकांसह विद्यार्थ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी संपूर्ण रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार धुळीची समस्या व त्यामुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी सदर रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०४-२०२६) :** (१) होय. हे अंशतः खरे आहे.

राज्य महामार्ग क्रमांक १०९ वरील धामोते ते कोदीवले दरम्यानच्या रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे.

(२) राज्य महामार्ग क्रमांक १०९ वरील धामोते ते कोदीवले दरम्यानच्या संपूर्ण लांबीत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे.

(३) राज्य महामार्ग क्रमांक १०९ वरील धामोते ते कोदीवले दरम्यानच्या रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम दिनांक २९/१०/२०२५ रोजी हाती घेण्यात आले असून सद्यःस्थितीत रस्त्याच्या सब ग्रेड, जिएसबी व डिएलसी चे काम प्रगतीपथावर असून काम कार्यादेशापासून ३० महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.